फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**उलटतपास शपथेवर आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.गवाणकर यांचे मार्फत.**

०४. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी वकीलांकडे फिर्यादीबद्दल माहिती देण्यासाठी गेली त्यावेळी मी तिच्यासोबत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छे क्र. २ मधील मजकूर "सदर दाव्यात दाद मागायची असल्याने मी व माझी पत्नी ............................................. आरोपींनी आम्हाला सांगितले की, आमचे वरपर्यंत हात पोहोचलेले आहेत. तुम्ही आमचे काही वाकडे करु शकत नाही " हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझीपत्नी असल्याने मी खोटा सरतपास नोंदविलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मुंबईचा दादा म्हणून ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. २३७२ब व स्टॉलचा ताबा मिळण्याची मागणी माझी सासू हिने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे भाडेकरु असल्याने त्यांनी ताबा देण्यास त्यांनी नाकारले. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझी पत्नी, माझा मेव्हूणा व माझी सासू हे घर क्र. २३७२ब व स्टॉलचा ताबा दांडगाईने घेण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने आमचेविरुध्द ताकीद मिळणेसाठी रे.दि.मु.नं. ८०/२०१७ चा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी रे.दि.मु.नं. ८०/२०१७ मध्ये आमचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश मिळविलेला आहे. कोर्टात खोटी साक्ष दिल्याने त्याचे परिणाम काय होतात याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी रे.दि.मु.नं. ८०/२०१७ मध्ये वकील देवून हजर झालेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला रे.दि.मु.नं. ८०/२०१७ ची संपुर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मेव्हणा साधा असल्याने मी त्याला आश्वासन दिले की, मी त्याला दांडगाईने ताबा मिळवून देतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. ०५/१२/२०१७ रोजी घर क्र. २३७२ब व स्टॉलवर येवून दांडगाई करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५/१२/२०१७ रोजी आम्ही लोखंडी दरवाज्याच्या बाहेरच्या बाजूस होतो तसेच आरोपी हे

घरात लोखंडी दरवाज्याच्या आतील बाजूस होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/१२/२०१७ रोजी मी घराच्या बाहेरुन आरोपींना संध्याकाळपर्यंत ताबा देवून घरी जायचे असे धमकावत होतो. हे म्हणणे खरे नाही की, बाहेर कोण धमक्या देत आहे हे पाहण्यासाठी आरोपी क्र. १ ची पत्नी दरवाज्याच्या आतील बाजूस आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना घाबरवण्यासाठी मी लोखंडी दरवाजा ताकदीने बाहेरुन आपटला. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी क्र. १ च्या पत्नीला डोक्यात दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की दि. ०५/१२/२०१७ रोजीच्या घटनेची तक्रार देण्यासाठी आरोपी हे मालवण पोलीस स्टेशन येथे गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी आम्ही पोलीस स्टेशन येथे उपस्थित होतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आम्ही आमची तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचा पती असल्याने तिच्या बाजूने खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या म्हणण्याप्रमाणे आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी पत्नी घर क्र. २३७२ब व स्टॉलच्या तेथे फोटो काढण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २२/०७/२०२५

एम.के.फकीह
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.